**निवडणुक निर्णय अधिकारी, दि अकोला जनता कमर्शियल को-ऑप.बँक लि., अकोला, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला यांचे कार्यालय, तापडिया नगर शाखा, पहिला मजला, जठारपेठ चौक, अकोला-444 005**

**दि अकोला जनता कमर्शियल को-ऑप.बँक लि., अकोला, र.नं.83/99**

**(बहुराज्यीय अनुसूचित बँक)**

## संचालक मंडळ निवडणुक कार्यक्रम (2024-2029)

## सर्व साधारण सभेची सुचना

बहु राज्य सहकारी संस्था अधिनियम, 2002 च्या कलम 45K(1) बहु राज्य सहकारी संस्था नियम 19F(a) द्वारे प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन सहकारी निवडणुक प्राधिकरणाने, दि अकोला जनता कमर्शियल को-ऑप.बँक लि; अकोला च्या सन् 2024-2029 या कालावधीच्या संचालक मंडळाची निवडणुक घेण्यासाठी निवडणुक निर्णय अधिकारी म्हणुन जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला यांची नियुक्ती केली आहे.

त्यानुसार मी अजित कुंभार, निवडणुक निर्णय अधिकारी, जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला बहु राज्य सहकारी संस्था नियम, 2002 च्या नियम 19(H)(4) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन याद्वारे दि अकोला जनता कमर्शियल को-ऑप.बँक लि; अकोला चे संचालक मंडळाच्या सदस्यांची निवडणुक घेण्यासाठी सर्वसाधारण सभा दिनांक 24.07.2024 रोजी बुधवार सकाळी 8.00 वाजता स्थळ : वर्धमान भवन, डी.एस.पी.ऑफिसजवळ, अकोला ता.जि.अकोला (महाराष्ट्र) येथे संचालक मंडळ सदस्यांच्या निवडणुकीचा निकाल जाहीर होईपर्यन्त खालील विषयाकरिता आयोजित करण्यातआलेली आहे. तरी सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

### बैठकीची विषयपत्रिका

1. निवडणुकीद्वारे 2024-2029 या कालावधीसाठी एकुण 18 मंडळ सदस्यांची निवड करणे.
2. उपविधी क्र.29 नुसार मतदार संघ

| | | |
|---|---|---|
| 1 | सर्वसाधारण | 13 |
| 2 | शाखा प्रतिनिधी<br>(बँकेच्या मुख्यालयापासुन 25 कि.मी.पेक्षा जास्त अंतरावरील शाखेच्या कार्यक्षेत्रात वास्तव्यास असणाऱ्या सभासदांमधुन) | 02 |
| 3 | महिला प्रतिनिधी | 02 |
| 4 | मागासवर्गीय प्रतिनिधी (अनुसुचित जाती/जमाती व विमुक्त जाती) | 01 |
| | | 18 |

3. मंडळाच्या सदस्यांचा निवडणुक कार्यक्रम खालीलप्रमाणे

| अ. क्र. | तपशील | तारीख | वेळ | ठिकाण |
|---|---|---|---|---|
| 1 | मतदानास पात्र असलेल्या सदस्यांच्या तात्पुरत्या यादीचे प्रकाशन | 01 जुलै 2024 (सोमवार) | सकाळी 11.00 वाजता | बँकेचे मुख्य कार्यालय, अकोला आणि बँकेच्या सर्व शाखा कार्यालयामध्ये |
| 2 | तात्पुरत्या यादीवर आक्षेप (असल्यास) मांडण्याची वेळ | 02 जुलै 2024 ते 08 जुलै 2024 (मंगळवार ते सोमवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त (प्रत्येक दिवस) | निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला. |
| 3 | मतदानासाठी पात्र असलेल्या सदस्यांच्या अंतिम यादीचे प्रकाशन | 09 जुलै 2024 (मंगळवार) | सकाळी 11.00 वाजता | बँकेचे मुख्य कार्यालय, अकोला आणि बँकेच्या सर्व शाखा कार्यालयामध्ये |
| 4 | नामनिर्देशन पत्र देणे व स्विकारणे | दि.10 जुलै 2024 ते 16 जुलै 2024 (बुधवार ते मंगळवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त दररोज | निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला. |
| 5 | प्राप्त झालेल्या नामांकनाच्या यादीचे प्रकाशन | दि.16 जुलै 2024 (मंगळवार) | सायंकाळी 5.00 वाजता | निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला. |
| 6 | प्राप्त नामनिर्देशन अर्जाची छाननी | दि.18 जुलै 2024 (गुरुवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त | निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला. |
| 7 | वैध नामांकनाच्या यादीचे प्रकाशन | दि.18 जुलै 2024 (गुरुवार) | सायंकाळी 5.00 वाजता | निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला. |
| 8 | नामनिर्देशन पत्रे मागे घेणे | दि.19 जुलै 2024 ते 20 जुलै 2024 (शुक्रवार ते शनिवार) | सकाळी 11.00 ते दुपारी 3.00 पर्यन्त | निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला. |
| 9 | निवडणुक लढविणाऱ्या उमेदवाराच्या अंतिम यादीचे प्रकाशन | दि.20 जुलै 2024 (शनिवार) | सायंकाळी 5.00 वाजता | निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालय, अकोला. |
| 10 | आवश्यक असल्यास मतदानाची तारीख | दि.24 जुलै 2024 (बुधवार) | सकाळी 8.00 ते सायंकाळी 4.00 पर्यन्त | वेळेवर जाहीर करण्यात येईल. |
| 11 | मतांची मोजणी आणि निकालांची घोषणा | दि.25 जुलै 2024 (गुरुवार) | सकाळी 11.00 ते मतमोजणी संपेपर्यन्त (सतत) | वर्धमान भवन, डी.एस.पी. ऑफिसजवळ, अकोला |

**टिप :-**

1. निवडणुक लढविणारा उमेदवार हा मल्टी स्टेट को-ऑपरेटिव्ह सोसायटीज ॲक्ट व रुल्स 2002, तसेच बँकेच्या उपविधीनुसार पात्रता धारण करणारा असावा. बँकेच्या उपविधी क्र.37 अन्वये सभासदाने धारण करावयाची पात्रता
   i. वैयक्तिक सभासद हा निवडणूक तारखेपूर्वी कमीत कमी एक वर्षापासुन सभासद असावा.
   ii. वैयक्तिक सभासदाचे नावे बँकेत बिनबोज्याची रु.10,000/- ची मुदत ठेव निवडणुक तारखेपूर्वी कमीत कमी दोन वर्ष पासुन असावी.
   iii. वैयक्तिक सभासद हा कायदा / नियम आणि बँकेचे उपविधीमधील तरतूदीनुसार अपात्र नसावा. सभासदाने वरील क्र.i) व ii) नुसार पात्रता धारण केली असल्याबाबत सक्षम अधिकाऱ्याचे प्रमाणपत्र नामनिर्देशन पत्रासोबत जोडणे आवश्यक आहे.
2. नामनिर्देशन अर्ज निवडणुक निर्णय अधिकारी यांचे कार्यालयात नि:शुल्क मिळतील. त्यासाठी नियमानुसार अर्ज दयावा लागेल व सदर अर्जात ज्या मतदार संघातून अर्ज भरावयाचा आहे तो नमूद करावा.
3. ज्या मतदार संघातुन उमेदवारास उभे राहावयाचे आहे त्या मतदार संघाचे नांव स्पष्टपणे नामनिर्देशन पत्रावर नमूद करणे आवश्यक आहे.
4. अनुसूचित जाती/जमाती, विमुक्त जाती मतदार संघातील उमेदवारांना नामनिर्देशन पत्रासोबत सक्षम अधिकाऱ्याचे जात प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे.
5. दाखल करण्यात येणाऱ्या नामनिर्देशन पत्रासोबत रु.5,000/- अनामत ठेव जमा करणे आवश्यक आहे.
6. मतदानाचे ठिकाण अकोला, मालेगांव, रिसोड, वाशिम, मंगरुळपीर, कारंजा, तेल्हारा, मुर्तिजापुर, अकोट, शिरपूर, मानोरा, अमरावती, खामगांव, जळगांव, यवतमाळ, नागपूर, दिग्रस, मलकापूर, परभणी, नांदेड, मुंबई, परतवाडा, चांदूर रेल्वे, औरंगाबाद, पुसद, बऱ्हाणपूर, इन्दौर, नाशिक, शेलु बाजार व लोणार - मतदान केन्द्रे नंतर प्रसिध्द करण्यात येतील.
7. सभासद/मतदारांची अद्यावत (दि.31/05/2024 ची) यादी या कार्यालयाच्या, बँकेचे मुख्य कार्यालय व सर्व शाखांच्या नोटीस बोर्डावर प्रसिध्द करण्यात येईल.
8. सार्वजनिक/शासकिय/निगोशिएबल इन्स्ट्रुमेन्ट ॲक्ट अंतर्गत सुट्टया वगळून इतर दिवस कामकाजाचे दिवस समजावे.
9. बहुराज्यीय सहकारी संस्था अधिनियम, 2002 च्या कलम 39(1)(O) नुसार निवडणुक प्रक्रिया सर्व साधारण सभेत घेण्यात येणार आहे, जेणेकरुन सभासद मतदारांना मतदान करणे सोईचे होईल. मतदान केलेल्या सभासदांची उपस्थिती ही सर्व साधारण सभेची उपस्थिती मानली जाईल.
10. बँकेच्या सर्व पात्र मतदारांनी एकुण 18 संचालकांच्या पदासाठी मतदान करायचे आहे.
11. मतदारांनी येतांना फोटो ओळखपत्र (सार्वत्रिक निवडणुकीसाठी लागु असलेल्या पैकी एक) सोबत आणणे बंधनकारक राहील.
12. काही अपरिहार्य कारणास्तव जाहीर झालेल्या निवडणूक कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार निवडणूक निर्णय अधिकाऱ्यास राहील.
13. दि.24/07/2024 रोजीच्या निवडणुकीबाबतची सुचना सर्व सभासदांना त्यांचे नोंदणी झालेल्या पत्त्यावर पाठविण्यात येत आहे.

### पदाधिकारी निवडणुक

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1 | पदाधिकारी निवडणुकीचे वेळापत्रक जाहीर करणे | दि.25 जुलै 2024 (गुरुवार) | मंडळ सदस्य निवडणुकीचा निकाल जाहीर झाल्यानंतर | मुख्य कार्यालय, अकोला |
| 2 | नव्याने स्थापन झालेल्या मंडळाची बैठक आणि वैध नामांकनासाठी यादीचे प्रकाशन, मतदान (आवश्यक असल्यास) आणि पदाधिकारी निवडीचा निकाल जाहीर करणे | दि.26 जुलै 2024 (शुक्रवार) | सकाळी 10.00 वाजता | मुख्य कार्यालय, अकोला |

सही

(अजित कुंभार, भा.प्र.से.)

निवडणुक निर्णय अधिकारी

दि अकोला जनता कमर्शियल को-ऑप.बँक लि;अकोला,

जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी, अकोला

अकोला :-

दिनांक :- 13.06.2024